**विषय :** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार ***"मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकाराचे प्रत्यायोजन".***

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**

जावक क्रमांक : मुकाअ/वै.का/ १३८ /२०१७.

नाशिक, दिनांक : १९/०६/२०१७.

**वाचा :** ०१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९६ (१).

## -: आ दे श :-

**०१.** गट-क व गट-ड संवर्गातील पारपत्र मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेची नस्ती मंजूर झालेनंतर माझे वैयक्तिक कार्यालयाकडून Annexure-B या इंग्रजी नमुन्यामध्ये No Objection Certificate (NOC) दिली जाते.

तथापि, माझेकडील कामाची व्याप्ती लक्षात घेता महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६(१) चे तरतुदीनूसार जिल्हा परिषदेतील आस्थापना विभाग प्रमुख यांना या आदेशान्वये अधिकार प्रदान करण्यांत येत आहे.

**०२.** पारपत्र मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र No Objection Certificate (NOC) ची नस्ती मंजूर करणेपूर्वी जिल्हा परिषदेच्या विभागाकडून किंवा पंचायत समितीकडून प्राप्त झालेले दाखले (उदा.कर्मचा-याचा ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेसाठीचा अर्ज, निवेदन/शपथपत्र, कुटूंबाचे प्रमाणपत्र/तपशील, विभागीय खातेचौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे, दक्षता पथकाचे प्रकरण प्रस्तावित वा प्रलंबित आहे किंवा कसे, फौजदारी प्रकरण प्रस्तावित वा प्रलंबित आहे किंवा कसे, सेवाविषयक प्रकरण न्यायालयांत प्रलंबित आहे किंवा कसे, नादेय दाखला इ.बाबीसंबंधातील दस्तऐवज काळजीपूर्वक तपासून घेणे आवश्यक आहे.

**०३.** संबंधित कर्मचाऱ्यांस पारपत्र मिळणेसाठी दोन प्रतीत मुळ ना-हरकत प्रमाणपत्र No Objection Certificate (NOC) दिल्यावर सदरचे कर्मचारी पारपत्र कार्यालयाकडेस सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करतात.

तद्नंतर पारपत्र कार्यालय सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र हे आपल्या कार्यालयानेच पारीत केले आहे किंवा नाही, याची शहानिशा करणेसाठी पारपत्र कार्यालयाकडून पत्र पाठविले जाते. त्यानंतर सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र आपल्या कार्यालयाने दिले असेल तर, समवेत जोडलेल्या इंग्रजी पत्राच्या नमुन्यानुसार (Confirmation) देण्यांत यावे.

**०४.** पारपत्र काढणेसाठी Annexure-B या इंग्रजी नमुन्यामधील No Objection Certificate (NOC) मध्ये जावक क्रमांक नमुद करावा, सदरच्या जावक क्रमांकासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यांत यावी.

**०५.** प्रस्तुत आदेशान्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्यास, व त्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास, संबंधीत अधिकाऱ्यांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यांत येईल, याची याव्दारे नोंद घ्यावी.

प्रदान करणेत आलेल्या अधिकारांमध्ये कोणत्याही वेळी, कोणत्याही कारणास्तव बदल करणेची किंवा काढुन घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यांत येत आहे.

प्रस्तुत आदेश **"स्थायी आदेश"** संचिकेत सामील करावा.

प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी, आदेशाच्या दिनांकापासुन करण्यांत यावी.

CHIEF EXECUTIVE OFFICER ZILLA PARISHAD, NASHIK सत्यमेव जयते

Deepak 19/06

(दीपक कुमार मीना)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जिल्हा परिषद, नाशिक**

**प्रत : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.**

०१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक.
०२. खाते प्रमुख (सर्व), ......................., जिल्हा परिषद, नाशिक.
०३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
०४. सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
०५. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) ........................
०६. उप अभियंता (ल.पा./इवद/ग्रापापु), जि.प.उपविभाग (सर्व) ........................
०७. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व) ........................
०८. बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.यो.(सर्व) ........................

**प्रत : कार्यालयीन प्रत / ज्ञापन नस्ती.**